CMYK



छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा:

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



मुरूममध्ये दहावीत गायत्री इंगळे प्रथम
पेज ४

■ दैनिक ■धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 93 ■ बुधवार दि.14 मे 2025 ■ RNI NO-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

## भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी दत्ताभाऊ कुलकर्णी; सर्वसमावेशक चेहरा, कार्यकर्त्यांतून स्वागत

### सर्वानुमते निवड, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खांदेपालट



आरंभ मराठी / धाराशिव

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लवकरच जाहीर होतील,अशी शक्यता आहे. त्यादृष्टीने सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. भारतीय जनता पार्टीनेही खांदेपालट केली असून, जिल्हाध्यक्षपदासाठी दत्ताभाऊ कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. सर्वसम ावेशक तसेच पक्ष, संघटन वाढीसाठी योगदान देणारा नेता म्हणून त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी येथील उद्योजक तथा भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ कुलकर्णी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत करण्यात येत आहे.भाजपच्या जिल्हाध्यक्षपदासाठी २० ते २२ जण इच्छुक होते. संताजी चालुक्य यांचा जिल्हाध्यक्षपदाचा कार्यकाळ अद्याप शिल्लक असल्याने त्यांचीच या पदावर पुन्हा एकदा निवड व्हावी, अशी त्यांची मागणी होती. मात्र पक्षश्रेष्ठींनी नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच विविध शाखेच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून जिल्हाध्यक्षपदावर दत्ताभाऊ कुलकर्णी यांची निवड केली आहे. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी यापूर्वीही पक्षाचे जिल्हाध्यक्षपद सांभाळले आहे. त्यांनी या काळात पक्ष संघटनेसाठी जोरदार काम केले होते. त्यांच्या कामाचा पक्षाला मोठा फायदा झाला होता. पदावर नसतानाही ते पक्ष संघटन वाढीसाठी कार्यरत होते.केलेल्या कामाची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांची जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी बँकिंग क्षेत्रात अल्पावधीत गरुडझेप घेतली. त्यानंतर त्यांनी गुळ पावडर उद्योग उभारून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला. १५ दिवसात शेतकऱ्यांना उसाचे बिल देण्याचे रेकॉर्ड त्यांनी केले असून, दोन कारखान्यांसोबत त्यांनी गुळाच्या पावडरपासून दैनंदिन वापरातील पदार्थ निर्मिती सुरू केली आहे.त्यांचे व्यवसायिक कौशल्य तसेच समाजकारण, राजकारणातील एकूणच सकारात्मक कार्यपद्धतीचा पक्षाला मोठा फायदा होऊ शकतो.त्यांच्या या निवडीबद्दल आमदार राणा जगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्यासह पक्षातील अनेक नेत्यांनी,पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत.

#### पक्षाच्या ध्येयधोरणांसाठी काम करणार

सगळ्यात मोठ्या राजकीय पक्षाचे जिल्हाध्यक्षपद मिळाल्याचा मनस्वी आनंद आहे. पक्षाच्या सर्व ज्येष्ठ नेत्यांनी, श्रेष्ठींनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून येणाऱ्या काळात पक्षाच्या ध्येयधोरणांसाठी, कार्यकर्त्यांसाठी तसेच प्रत्येक नागरिकांसाठी काम करत राहणार आहे.
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत देखील पक्षातील कार्यकर्त्यांना बळ देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असेल.
– दत्ताभाऊ कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष,भाजप

या निवडणुकीत भाजपला अधिकाधिक जागा मिळण्यासाठी पक्षाचा प्रयत्न असेल. त्यासाठी मजबूत संघटन आवश्यक आहे.ही बाब विचारात घेऊन राज्यात पक्षांतर्गत खांदेपालट करण्यात आली आहे.दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी यापूर्वी जिल्हाध्यक्ष असताना पक्षासाठी दिलेले योगदान विचारात घेतले गेले आहे. शिवाय ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात.

## १३८ गावात सूक्ष्म नियोजन प्रक्रियेचा जागर

■ नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची पूर्वतयारी जोरात ■ प्रक्रियेत नागरिकांच्या सहभागाची गरज

सज्जन यादव / आरंभ मराठी

धाराशिवःनानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा टप्पा क्रमांक २ ही योजना धाराशिव जिल्ह्यातील १३८ गावात राबवली जात आहे. याची प्रक्रिया सुरू झाली असून, सध्या जालना जिल्ह्यातील १३८ गावात सुक्ष्म नियोजन प्रक्रियेचा जागर होताना दिसत आहे. पोकरा योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी आणि योजनेचा लाभ सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी कृषी विभागाकडून गेल्या काही महिन्यांपासून निवड झालेल्या गावांमध्ये पूर्वतयारी केली जात आहे. ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सूक्ष्म नियोजनाचा जागर प्रत्येक गावात सुरू असून, योजनेची उद्दिष्टे, योजनेचे लक्ष्य आणि नागरिकांकडून असणाऱ्या अपेक्षा या गोष्टी साध्य करण्यासाठी कृषी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत.
नानाजी देशमुख कृषी संजीवनी ही योजना शेतकऱ्यांसाठी महत्वाची व महत्वाकांक्षी ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभासाठी ४० ते ७५ टक्के पर्यंत अनुदान कृषी विभागाच्या माध्यमातून दिले जाणार आहे. तर सामायिक घटकासाठी १०० टक्के पर्यंत अर्थसहाय्य दिले जाणार आहे. ग्रामस्तरीय सुक्ष्म नियोजन प्रक्रियेला पूर्ण करण्यासाठी वेगवेगळ्या संस्थांची मदत घेतली जात आहे. तसेच यातील विविध घटकांना प्रशिक्षण देखील दिले जात आहे. सूक्ष्म नियोजन प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील १३८ गावांना वेळापत्रक बनवून दिले असून, त्याप्रमाणे प्रत्येक गावात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. या नियोजन प्रक्रियेत समन्वयकांना कृषी संजिवनी समिती पदाधिकारी, कृषी सहाय्यकांची साथ मिळत आहे. गावाच्या विकासासाठी सरपंच अध्यक्ष असलेली ग्राम कृषी संजीवनी समिती या प्रक्रियेत हिरीरीने भाग घेत आहे. ० ते ५ दिवसांचा कार्यक्रम या आराखड्यासाठी तयार करण्यात आला आहे. यामध्ये गावाच्या संसाधनांचा अभ्यास केला जाणार आहे. उपलब्ध संसाधनांचा इष्टतम वापर करुन गावाला विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

POCRA

#### यांचे झाले प्रशिक्षण

पोकरा योजना राबविण्यासाठी यातील संबंधित सर्व घटकांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. यामध्ये सरपंच, कृषी सहायक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि उपविभागीय कृषी अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. मंडळ, तालुका व उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांना वनामती नागपूर येथे, कृषी सहायकांना छत्रपती संभाजीनगर येथे तर सरपंचांना कृषी विज्ञान केंद्र, लातूर येथे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

#### कृषी ताईची ग्रामसभेत होणार निवड

निवड झालेल्या प्रत्येक गावात एका कृषी ताईची निवड करण्यात येणार आहे. किमान दहावी उत्तीर्ण, स्मार्ट फोन वापरण्याचे ज्ञान आणि काम करण्याची आवड असणाऱ्या महिलेची ग्राम सभेतून निवड करण्यात येणार आहे. पोकरा योजनेतून महिला सक्षमीकरण करण्याचे प्रयत्न केले जाणार असल्याने या पदाला देखील महत्व आहे. कृषी ताईची निवड ग्रामसभेतून केली जाणार असून, कृषी ताईला मानधन देखील दिले जाणार आहे.

#### ग्रामसभेला विशेष महत्त्व

पोकरा योजनेत ग्रामसभेला विशेष महत्व आहे. कारण सरपंचाच्या अध्यक्षतेखालील समिती गाव पातळीवर गाव विकास आराखडा तयार करणार आहे. हा आराखडा पुढे तालुका, उपविभागीय आणि जिल्हाधिकारी स्तरावर जाणार आहे. शेवटी जिल्हाधिकारी याला अंतिम मजुरी देणार आहेत.

#### योजनेत निवडलेली तालुकानिहाय गावे

| | |
|---|---|
| धाराशिव | २४ |
| तुळजापूर | १९ |
| कळंब | १८ |
| उमरगा | २१ |
| लोहारा | ६ |
| वाशी | ८ |
| भूम | २३ |
| परंडा | १९ |

#### अशी आहे सूक्ष्म नियोजन प्रक्रिया

शून्य दिवस – ग्राम कृषी विकास समितीची बैठक, मशाल फेरी, गाव बैठक
पहिला दिवस – प्रभात फेरी गाव नकाशा, लक्ष्यगट चर्चा
दुसरा दिवस – श्रमदान, पाण्याचा ताळेबंद, मूल्य साखळी, शिवार फेरी
तिसरा दिवस – संसाधन नकाशा, आराखड्याचा मसुदा, महिला सभा
चौथा दिवस – मूल्य साखळी पशुधन, ग्राम सभा व प्रकल्प कृती आराखड्यास मंजुरी



#### सूक्ष्म नियोजन प्रक्रियेत नागरिकांनी सहभाग घ्यावा



नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २.० अंतर्गत निवडलेल्या गावामध्ये लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन प्रक्रिया सुरू आहे. १३८ गावांचे शेड्युल तयार करण्यात आले आहे. ही प्रक्रिया जून अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर जुलै महिन्यात ऑनलाइन प्रक्रिया सुरू होऊन नागरिकांना प्रत्यक्ष योजनेचा लाभ घेता येईल असे नियोजन आहे. गावातील नागरिकांनी या योजनेत सहभाग घेऊन योजना समजून घ्यावी आणि त्यामध्ये योगदान द्यावे.

– रविंद्र माने
जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी
धाराशिव

## रिक्षाचालकावर जीवघेणा हल्ला


आरंभ मराठी / उमरगा

मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोथळी येथील एका ४० वर्षीय रिक्षाचालकावर तिघांनी ''तुमच्या खानदानामुळे आम्हाला वाईट दिवस आले आहेत'' असे म्हणत जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना दिनांक ४ मे रोजी रात्री घडली. या हल्ल्यात रिक्षाचालकाला कोयता, लोखंडी पात्याचे हत्यार व दगडाने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले असून, मुरुम पोलिसांनी याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जखमी रिक्षाचालकाचे नाव मिलींद शरणु कांबळे (वय ४०, रा. कोथळी, ता. उमरगा) असे आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परमेश्वर विठ्ठल गुंडरगे, अभि रुपचंद मंडले आणि अविनाश तुळशीराम फिरंगे (सर्व रा. कोथळी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ मे रोजी रात्री सुमारे साडेदहा वाजता मिलींद कांबळे हे मुरुम मोडकडून मुरुमकडे जाणाऱ्या रस्त्यावर एम.एस.ई.बी. पॉवर हाऊसजवळून आपल्या रिक्षाने जात असताना आरोपींनी त्यांची रिक्षा अडवून शिवीगाळ करत ''तुमच्या खानदानामुळे आम्हाला वाईट दिवस आले आहेत'' असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत कोयता, लोखंडी पात्याचे हत्यार व दगडांचा वापर करून गंभीर जखमी केले. या घटनेनंतर कांबळे यांनी ५ मे रोजी मुरुम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून भारतीय दंड विधानातील कलम १०९, १२६(२), ३५१(२), ३५१(३), ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध घेतला जात असून पुढील तपास मुरुम पोलीस करत आहेत. ही घटना गावात खळबळ निर्माण करणारी ठरली आहे.

## मदत करण्याचे आमिष दाखवून मुलीवर लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी / उमरगा

बस स्थानकावर थांबलेल्या मुलीला मदत करतो म्हणत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उमरगा तालुक्यातील एका गावात घडली.



यासंबधी सविस्तर वृत्त असे की, उमरगा तालुक्यातील एका गावातील २५ वर्षीय मुलगी दिनांक ८ मे ते १० मे दरम्यान गावी जाण्यासाठी बसस्थानक येथे थांबली होती. त्यावेळी एका तरुणाने तिला जेवण देतो व मदत करतो असे म्हणून त्या मुलीला रुमवर नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. पिडीत तरुणीने दिनांक १२ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–६४, अ.जा.ज.अ.प्र. कायदा कलम ३(१)(W) (i)) (ii), ३(२) (v))अन्वये उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## दहावीच्या परिक्षेत भोसले हायस्कुलचे यश, निकाल ९७ टक्के

आरंभ मराठी / धाराशिव



श्रीपतराव भोसले हायस्कूलने याही वर्षी दैदिप्यमान कामगिरी बजावत यशाची परंपरा कायम राखत उज्ज्वल यश प्राप्त केले. प्रशालेचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९७.१७ टक्के लागला असून, शाळेच्या दोन विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण प्राप्त झाले आहेत. श्रावणी पवार आणि श्रेयस पवार यांनी १०० टक्के गुण मिळवून यश मिळवले. महाराष्ट्रातील सर्वात मोठी विद्यार्थी संख्या असलेली मराठी माध्यमाची शाळा म्हणून ओळख असलेल्या या प्रशालेत इयत्ता दहावीला १०२६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शेकडा ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे तब्बल १७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी केला. या सत्कार प्रसंगी संस्थाध्यक्ष सुधीर पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या सरचिटणीस प्रेमा सुधीर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, गुणवत्ता सुधार समितीचे प्रमुख मनोज भुसे तसेच सर्व पदाधिकारी, पालक, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

## धाराशिवसह भूम, तुळजापूर भागात जोरदार पाऊस

आरंभ मराठी / धाराशिव

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार मंगळवारी सायंकाळी धाराशिव शहरात जोरदार पाऊस झाला. या पावसाने काही भागात पाणी साचले होते.अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला होता. रात्री उशिरापर्यंत अनेक भागात अंधार होता. सायंकाळी साडेचार ते पाचच्या सुमारास भूम तालुक्यातील पाथरूडसह वेगवेगळ्या भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला तसेच तुळजापूर शहरासह परिसरात जोरदार पावसाने पाणीच पाणी झाले होते. हवामान खात्याने अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली असून, येणाऱ्या चार ते पाच दिवसात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. या अवकाळी पावसामुळे उष्णता कमी होऊन आल्हाददायक वातावरण तयार झाले आहे.मात्र वादाने अनेक भागात नुकसान झाले आहे.

## धाराशिव बस स्थानकात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे मॉक ड्रील

### संकटकाळात सर्व यंत्रणा कशा काम करतात,केली पडताळणी



आरंभ मराठी / धाराशिव

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.१३) सकाळी ९:३० वाजता धाराशिव येथील मध्यवर्ती बस स्थानकावर मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. मानवनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्ती आल्यास सर्व यंत्रणा कशा काम करतील हे तपासण्यासाठी हे ड्रिल घेण्यात आले. बस डेपोमध्ये बसने अचानक पेट घेतल्याची आपत्कालीन परिस्थिती उभी करून,त्या अनुषंगाने विविध यंत्रणांची तयारी तपासण्यात आली. ही माहिती आगार व्यवस्थापक बालाजी भांगे यांनी पोलिस नियंत्रण कक्ष, निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, १०८ रुग्णवाहिका सेवा, अग्निशमन दल व होमगार्ड यांना दिली. यानंतर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून आग विझवली, तर १०८ रुग्णवाहिका व पोलिस दलानेही तत्पर प्रतिसाद दिला. या मॉकड्रिल प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती शोभा जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''कोणत्याही आपत्तीमध्ये संयम व धैर्य राखणे अत्यावश्यक आहे. प्रशासन सज्ज राहण्यासाठी या मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले असून ते यशस्वीरीत्या पार पडले आहे. या मॉकड्रिलला विभागीय वाहतूक अधिकारी एस.टी.महामंडळाचे अभय देशमुख, उपविभागीय अधिकारी श्रीमती अरुणा गायकवाड, तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, महसूल तहसीलदार अभिजीत जगताप, बीडीडीएस पथक, होमगार्ड पथक, जिल्हा शोध व बचाव कार्य टीम तसेच एस.टी.महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आपत्तीच्या काळात यंत्रणांचे सुसूत्री व समन्वित कार्य महत्त्वाचे असते, हे या मॉकड्रिलद्वारे अधोरेखित झाले.

## राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांचा भूमी अभिलेख कार्यालयात ठिय्या

### अनुपस्थित अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरीतून केला निषेध

आरंभ मराठी / उमरगा



बलसुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मोजणीसंदर्भातील भूमी अभिलेख कार्यालयाच्या अक्षम्य दिरंगाईला अखेर ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भिडले. मंगळवारी (ता.१३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली बलसुर व परिसरातील नागरिकांनी भूमी अभिलेख कार्यालयात ठिय्या आंदोलन करत निषेध व्यक्त केला.विशेष म्हणजे अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरीच्या माध्यमातून अनोखा निषेध नोंदवण्यात आला. बलसुर येथे २४ नोव्हेंबर २०२३ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळाल्यानंतर, त्या केंद्रासाठी गायरान जमिनीवरील मोजणीचा प्रस्ताव २० जानेवारी २०२४ रोजी भूमी अभिलेख कार्यालयात दाखल करण्यात आला. मात्र, आजतागायत तब्बल दीड वर्ष उलटून गेल्यानंतरही प्रस्तावावर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. दरम्यान तहसील कार्यालयाने ११ जुलै २०२४ व १४ ऑक्टोबर २०२४ रोजी दोन वेळा भूमी अभिलेख विभागाला स्मरणपत्रे पाठवली, तरीही या विभागाने तितकीच दुर्लक्षाची भूमिका घेतली.दिरंगाईमुळे मंजूर झालेले प्राथमिक आरोग्य केंद्र अद्याप सुरू होऊ शकलेले नाही. परिणामी बलसुर व पंचक्रोशीतील नागरिक आरोग्य सुविधांपासून वंचित राहिले आहेत. शासकीय यंत्रणांनी अशा प्रकारची अनास्था दाखवली, तर सामान्य माणसाला न्याय मिळणार कसा,असा सवाल उपस्थित करत प्रा.बिराजदार यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यांनी सांगितले की, लवकरात लवकर मोजणी करून आवश्यक कागदपत्रे दिली गेली नाहीत, तर बलसुर व परिसरातील गावांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल.

CMYK

# शेर शिवा का छावा; छत्रपती संभाजी महाराज



**स्वराज्यरक्षक** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची आज जयंती आहे. संकटांवर पाय देवून उभे राहणारे निर्विवाद वर्चस्व गाजवणारे, तेजोमय कारकीर्द असणारे स्वराज्याची धुरा सक्षमपणे सांभाळणारे हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा पराक्रम करणारे छत्रपती संभाजीराजे हे असाम ान्य व्यक्तीमत्व होय. प्रचंड धैर्य अजोड पराक्रमी असामान्य शौर्य, अथक परिश्रम, प्रयत्नवादी अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृतम ध्ये तर पंडितच होते.धर्माभिमानी व्यासंगी, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवणारे छत्रपती संभाजी राजेंचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. सनई-चौघडे वाजू लागले,आनंदी आनंद वातावरण झाले. भगवा अभिमानाने फडकू लागला, सह्याद्री आकाशाच्या उंचीने दिल्लीकडे ताठ नजरेने पाहू लागला. अवघा दक्खन मंगलमय झाला. सह्याद्रीच्या कानाकोपऱ्यात एकच आरोळी घुमू लागली, माझा राजा जन्मला, माझा शंभो जन्मला. छत्रपती शिवाजी राजे यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. त्यांचे नाव म्हणजे छत्रपती संभाजी राजे. छत्रपती शिवाजी राजेंचे संभाजीराजेंवर अपार प्रेम होते. संभाजी राजेंच्या मातोश्री सईबाई या राजे २ वर्षांचे असतानाच मरण पावल्या. नशिबाने दश अवतार दाखवायला सुरुवात केली.सईबाईंच्या अकाली निधनानंतर त्यांचा संभाळ हा राजमाता जिजाऊंनी केला.

### जिजाऊंचे संस्कार म्हणजे शंभूराजा...

शिवरायांची तळपती तलवार म्हणजे शंभूराजा... सळसळत्या रक्ताचा धगधगता अंगार म्हणजे शंभूराजा... मराठ्यांचे उसळते रक्त म्हणजे शंभूराजा... केशवभट आणि उमाजी पंडीत यांनी संभाजी राजेंना शिक्षण दिले.लहान असताना त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर माया केली. संभाजी राजेंनी राजकारणातील,डावपेच,गनिमी कावा ई. चे शिक्षण लहानपणीच आत्मसात केले. जेंव्हा छत्रपती शिवाजी महाराजासोबत संभाजीराजे आग्रा मोहिमेवर गेले होते. त्यावेळी ते केवळ ९ वर्षांचे होते. आग्र्याहून रायगडावर परत येताना संभाजी राजेंनी त्यांचे दाखवलेले बुद्धीचातुर्थ तर अर्वणीय असेच आहे. वयाच्या आवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी 'बुद्धभूषण' हा ग्रंथ लिहिला.गागाभटांकडून, नीतिपर 'समयनय' हा ग्रंथ संभाजी राजेंनी लिहून घेतला तर 'धर्मकल्पलता' हा ग्रंथ केशव पंडिताने संभाजी राजासाठी लिहला.



अ‍ॅड.जयश्री तेरकर, धाराशिव

पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी राजेंनी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली. श्री शंशो: शिवजातस्य मुद्राघौरिव राजते । यद कसे विनी लेखा वतर्ते कस्यनोपरि ।।' अशी मुद्रा छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांची होती. मराठा साम्राज्याच्या १५ पट असणाऱ्या मुघल साम्राज्याशी संभाजी महाराजांनी एकहाती लढा दिला. पुरेपूर 'गनिमी कावा' वापरून औरंगजेबाला जेरीस आणले. त्यांच्या अस्तित्वात एकही लढाई मध्ये त्यांना अपयश आले नाही.शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला तब्बल ५ वर्षे झुंजवत ठेवला. १६८९ च्या सुरुवातीला छत्रपती संभाजीहराजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेबचा सरदार मुर्करबखान यांनी संगमेश्वरवर हल्ला केला. मराठ्यात आणि मुघल सैन्यात चकमक झाली.मराठ्यांचे सैन्यबळ कमी पडले. परिणामी शत्रुने संभाजीराजे व कवी कलश यांना मुघलाने पकडले व बहादूरगड येथे आणण्यात आले. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी फाल्गुन अमावस्या म्हणजेच ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराज यांची प्राणज्योत म ालवली. असह्य यातना सहन केल्या, परंतू स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा संभाजी राजेंनी सोडली नाही. म्हणून त्यांना अखंड भारतवर्षांने 'धर्मवीर' ही पदवी मरणोत्तर बहाल केली.

''पाहुनी शौर्य तुझ्यापुढे मृत्यू नतम स्तक झाला स्वराज्याचा मातीसाठी माझा शंभो अमर झाला''...


# आंबेडकरी चळवळीतील महिलांचे योगदान

**भारतीय** पुरुषसत्ताक समाजात स्त्री ही कायम उपेक्षित राहिली आहे.त्यातही तथाकथित मागासलेल्या समाजातील स्त्रीबद्दल तर काही बोलायलाच नको,एक तर वर्ण आणि जातीव्यवस्थेने लादलेली धार्मिक,सामाजिक गुलामगिरी त्यात पुन्हा स्त्रीचं जीवन.भारतीय समाजातली पन्नास टक्के लोकसंख्या जी महिलांची होती ती शतकानुशतके अज्ञानाच्या,उपेक्षेच्या घोर अंधारात राहात आली होती,पण जेव्हा बहूजनसमाजाला आणि त्यांच्यातील स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडी करुन देण्याची महात्मा जोतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी क्रांतीकारी कामगिरी बजावली आणि अज्ञानाचा अंधार नष्ट होण्यास सुरुवात झाली,पुढे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तर संपूर्ण दलित समाजाला प्रचंड प्रेरणा दिली,

### बौद्धधम्माची दिक्षा घेतल्यानंतर

संपूर्ण देशातील वंचित समाजामध्ये परिवर्तनाचे वारे वाहाण्यास सुरुवात झाली.येथील अन्यायी व्यवस्थेने आजवर निव्वळ गुलाम म्हणून वागवलेल्या कोट्यवधी पिडित जनतेला शिक्षणामुळे सन्मानाने जगण्याचा मार्ग मोकळा होऊ शकला. सनातनी व्यवस्थेने किडलेल्या या देशाला परिवर्तनवादी विचाराच्या महामानवांनी नवसंजीवनीच दिली.त्यातून फक्त समाजातील पुरुषवर्गच नव्हे तर स्त्रियादेखील शिक्षणाच्या माध्यमातून स्वतः ची,कुटुंबाची आणि पर्यायाने संपूर्ण समाजाची सर्वांगिण प्रगती साधण्यात अग्रेसर झाल्या.स्त्रियांनामानसिक गुलामगिरीतून बाहेर काढायचे असेल तर तिला शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याचे महात्मा फुले यांनी जाणले होते.म्हणूनच त्यांनी सावित्रीमाईला शिक्षित करुन स्त्रीशिक्षणाला चालना दिली.त्यासाठी फुले दांपत्याने अविरत संघर्ष केला,ज्यावेळी स्त्रीने शिकणे म्हणजे पाप मानले जायचे अशा काळात सनातनी प्रवृत्तीशी झटझोंब घेत शिक्षणप्रसाराचे क्रांतीकार्य केले.पुढे महात्मा फुले यांना गुरु मानून बाबासाहेबांनी न्याय,समता,स्वातंत्र्य,बंधूता या श्रेष्ठ मानवी मूल्यांना आदर्श मानीत माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रदान केला.मनुस्मृतीसारख्या विषमतावादी ग्रंथाची जाहीरपणे होळी करुन बाबासाहेबांनी स्त्रीस्वातंत्र्यासाठी एल्गार केला.प्रचंड सामाजिक,राजकीय आणि धार्मिक संघर्षानंतर वंचित समाजातल्या स्त्रिया शिकू लागल्या,लिहू-वाचू लागल्या. आपले विचार परखडपणे मांडू लागल्या.त्यासाठी बाबासाहेबांना मानवमुक्तीचा मोठा लढा उभारावा लागला.त्यातूनच पुढे आंबेडकरी विचाराची चळवळ चहूअंगाने फुलू-फळू लागली. त्यात महिलासुद्धा मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या.त्यावरच 'आंबेडकरी चळवळीतील महिलांचे योगदान' या प्रा.डॉ.ज्योती रामचंद्र सुरवसे लिखित पुस्तकात झोत टाकण्यात आला आहे. या पुस्तकातून आपण आंबेडकरी चळवळीतील महिलांचा शोध आणि बोध घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रा.डॉ.सुरवसे म्हणतात.

### 'शिका,संघटित व्हा,संघर्ष करा'




या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संदेशाबरहुकूम भारतातील वंचितवर्गातील जनता शिकून,संघटित होऊन जेव्हा संघर्ष करायला लागली,तशी देशाच्या प्रगतीची गती अनेकपटीने वाढली.पुरुष शिकला तर फक्त तो एकटाच शिक्षित होतो पण कुटुंबातली स्त्री शिकली तर अख्खे कुटुंबच ती शिक्षित करते याचा प्रत्यय आजवर शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लाखो कुटुंबांनी घेतला,हे सगळे आंबेडकरी चळवळीचे फलित होते.मूळ विषयाकडे वळण्यापूर्वी पूर्वपिठीकेत भारतातप्राचीन काळापासून ते मध्यपूर्वकाळ,ब्रिटीश काळ ते स्वांतंत्र्यानंतरच्या काळात स्त्रियांची काय अवस्था होती याचा धावता आढावा घेण्यात आला आहे. सतीप्रथा,विधवाविवाह बंदी या आणि अशा अनेक बुरसटलेल्या रुढींना परंपरेच्या नावाखाली स्त्रियांवर लादण्यात आले होते,सामाजिक चळवळी आणि शिक्षण,प्रबोधनाच्या माध्यमातून स्त्रिया या धार्मिक रुढींच्या कचाट्यातून मुक्त होत गेल्या.स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक चळवळीत आपले योगदान देणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्याही लक्षणीय होती. पुढे बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेद्वारे स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार प्रदान करुन सामाजिक क्रांतीचा कळसाध्यायच गाठला.देशाच्या स्वातंत्र्यानंतर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातूनबाबासाहेबांनी समाजातील सर्वच महिलांसाठी मुक्तीचे कवाडच उघडले.तथागत बुद्धाच्या अपारकरुणेने ओथंबलेले काळीजच अशा प्रकारची युगप्रवर्तक कामगिरी बजावू शकते,जी बाबासाहेबांनी बजावली.धर्माने स्त्रीला उपभोग्य वस्तु मानलेले असताना हिंदू कोड बिला च्या द्वारे बाबासाहेबांनी स्त्रीला एक माणूस म्हणून जे जे हक्क,अधिकार बहाल करता येणे शक्य होते ते बहाल केले.त्यातूनच स्त्रिया राजकारण,साहित्य याशिवाय समाजातील प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवू लागल्या अशा कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा आढावा या पुस्तकात विस्तृतपणे घेतला आहे.त्यामध्ये मराठी आणि हिंदी साहित्यात मोलाची भर टाकणाऱ्या निवडक स्त्रीसाहित्यिकांच्या साहित्यावर कटाक्ष टाकला गेलाय. यात प्रामुख्याने ज्येष्ठ कवयित्री हिराबाई बनसोडे,ज्योती लांजेवार,सुगंधा शेंडे,सुरेखा भगत,प्रज्ञा लोखंडे-पवार, मीना गाभिये ते सुशिला टाकभौरे इत्यादी कवियित्रींचे आणि शांताबाई काळे,बेबीताई कांबळे,जनाबाई गिऱ्हे,उर्मिला पवार,म ल्लिका अमरशेख, नजुबाई गावीत यांच्यासारख्या साहित्यिक,लेखिकांच्या योगदानाची दखल घेण्यात आली आहे.मराठी साहित्यात एकेकाळी दलित साहित्याने मोठी खळबळ उडवून दिली होती,वंचित आणि उपेक्षित समूहातून आलेल्या लेखकांनी आपले दाहक अनुभव शब्दात चितारुन प्रचंड खळबळ उडविली होती,मराठी साहित्याचा आजवर राहिलेला सवर्ण,ब्राह्मणी म्हणजेच उच्चवर्णीय तोंडवळा खरवडून टाकण्याचे व बदलण्याचे कार्य आंबेडकरी साहित्याने केले.यात दलित स्त्री साहित्यिकाही मागे राहिल्या नाहीत. आपल्या प्राजंळ आत्मकथनाने समाजाचा जातीय चेहरा जगापुढे मांडताना आंबेडकरी विचाराने पेटलेल्या स्त्रिया जराही डगम गल्या नाहीत.ही आंबेडकरी विचारांची महाप्रेरणा होती. ज्यामुळे मराठी साहित्याचा केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही दबदबा निर्माण होण्यास मदत झाली.






भरत यादव, ९८९०१४०५००.

आपल्या आत्मकथनात्मक लेखनाने आणि कथा,कादंबऱ्यांनी मराठी साहित्यसृष्टी ढवळून काढण्याची कामगिरी आंबेडकरी स्त्रीसाहित्यिकांनी केली आहे.सम ाजातील अमानुष रुढी,जातीभेदाचा दाहक अनुभव यावर कडाडून हल्ला करण्याची संधी त्यांना साहित्याने दिली. शिक्षणाने मिळालेले असीम धैयच याला मुख्यत्वे कारणीभूत होते.म्हणूनच आपल्या मुक्तीदात्या महामानवांविषयी अपार कृतज्ञता व्यक्त करायला या आंबेडकरी साहित्यिका मुळीच विसरत नाहीत.मराठी साहित्य प्रांतात आंबेडकरी विचाराच्या जाणीवेने लिहिणाऱ्या एकामागोमाग अनेक पिढ्या निर्माण झाल्या आणि अजूनही होत आहेत.शिक्षणाच्या सार्वजनिक प्रसारामुळेच ही किमया साधली गेली.भारतातील प्रत्येक स्त्री जगातल्या कुठल्याही प्रगतीशील देशातल्या स्त्रीच्या बरोबरीने प्रगती साधताना दिसत आहे.

सामाजिक चळवळीत अग्रेसर राहिलेल्या स्त्रियांनी समाजापुढे आपला आगळवेगळा आदर्शच निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नव्या पिढीतील तरुणी

देखील आकाशाला गवसणी घालण्याची कामगिरी करु शकतात. प्रा.डॉ.ज्योती रामचंद्र सुरवसे यांनी प्रस्तुत पुस्तकातून आंबेडकरी चळवळीतील महिलांचे योगदान अधोरेखीत करुन एका दुर्लक्षित विषयाकडे लक्ष वेधले आहे. पुस्तकामध्ये संदर्भ साहित्याची विस्तृत सूची आणि ऐतिहासिक छायाचित्रेही देण्यात आली आहेत,त्यामुळे या पुस्तकाला ऐतिहासिक दस्ताऐवजाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

----

**पुस्तकाचे नाव:**

**आंबेडकरी चळवळीतील महिलांचे योगदान**

**लेखिका:**

**प्रा.डॉ.ज्योती रामचंद्र सुरवसे**

**प्रकाशक:**

**थिंक टँक पब्लिकेशन्स,सोलापूर**

**पृष्ठसंख्या: २८७**

# गटारी साफ करण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



**आरंभ मराठी/ तुळजापूर**

तुळजापूर शहरातील प्रभाग क्रमांक चार मधील गटारी गेल्या सात म हिन्यापासून साफ केल्या नसल्याने या भागात दुर्गंध पसरली असून, डासाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे लहान मुले तसेच नागरिक मोठ्या प्रम ाणावर आजारी पडत असून या भागात तात्काळ स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी जाणता राजा युवा मंचच्या वतीने मुख्याधिकारी नगरपरिषद यांना करण्यात आली आहे. तसेच येत्या पाच दिवसात या भागात स्वच्छता न झाल्यास सोम वार दिनांक १९ मे रोजी भागातील सर्व गटारी स्वखर्चाने साफ करून तो कचरा नगर परिषदेच्या कार्यालयात टाकण्याचा इशारा देखील या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी सुदर्शन वाघम ारे, अनमोल साळुंखे, दत्ता बेंद्रे, सचिन खोले, शशिकांत मस्के, विशाल साखरे, शेखर साळुंखे, शिवा महामुनी आदी उपस्थित होते.

# २८ वर्षांनंतर माजी विद्यार्थी एकत्र, पुन्हा फुलला शिक्षणाचा मळा

**आरंभ मराठी/ धाराशिव**

तालुक्यातील उपळे (मा.) येथील केंद्रीय प्राथमिक शाळा, हरिभाऊ घोगरे हायस्कूल आणि केशरबाई लिंबराज पडवळ ज्युनियर कॉलेज या कॉलेजमध्ये शै.१९८७-८८ (पहिली) ते शै. वर्ष १९९८-९९ (बारावी) दरम्यान शिकलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा हरिभाऊ घोगरे हायस्कूल उपळे (मा) येथे संपन्न झाला. सदर स्नेह मेळाव्यासाठी साधारण ९० विद्यार्थी आणि ते ३० शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.शाळेच्या मैदानावर राष्ट्रगीत, राज्यगीत आणि संविधान घेऊन सर्व विद्यार्थ्यांनी त्यावेळचा इयत्ता दहावीचा वर्ग भरवण्यात आला.त्यामुळे २८ वर्षांनी एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा मिळाला.गवळी सर यांनी सर्व विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा हजेरी घेतली. हजेरी देताना आणि ओळखी करून घेताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्यामुळे शिक्षकांसह अनेक विद्यार्थ्यांना अश्रू अनावर झाले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्षांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर दरम्यानच्या काळात दिवंगत झालेल्या शिक्षक-शिक्षिका तसेच कर्मचारीवृंद व काही जिवलग वर्गमित्र या सर्वांचे स्मरण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सर्व शिक्षकांना भेटवस्तू देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी वनिता घोगरे, स्वाती सुतार, अविनाश शिंदे, बालाजी पाटील, राहुल निकम आणि दशरथ घोगरे यानी



मनोगते व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. दौलतराव माने सर, दत्तप्रसाद जंगम सर, चौधरी सर यांनी मार्गदर्शनपर मनोगते व्यक्त केली. त्यात श्री जंगम सरांनी 'केवळ तुम्हा मुलांचाच हा स्नेहमेळावा नसून तुमच्यामुळे हा आमचाही स्नेहमेळावा घडून आलेला आहे.' असे भावनिक उद्गार काढले.कार्यक्रमाचे अध्यक्षपद सेवानिवृत्त मुख्याध्यापक हनुमंत देशमुख यांनी भुषविले तर संस्थेचे जनरल सेक्रेटरी अरुण घोगरे प्रमुख पाहुणे होते. तर श्रीम पाटील मॅडम व श्रीम सुतार मॅडम, सर्वश्री पी आर देशमुख सर, दौलतराव माने सर, बी.जी. चव्हाण सर, महादेव सुतार सर, डी वाय चव्हाण सर, बाराते सर, गवाड सर, व्ही. आर. पडवळ सर, एस एल पडवळ सर, गवळी सर, चौधरी सर, दत्तप्रसाद जंगम सर, बी टी घोगरे सर, श्रीम नायगांवकर मॅडम आणि करपे मॅडम, प्रभाकर घोगरे सर, मिटकरी सर, उजनकर सर, नवले सर आणि शिक्षकेतर कर्मचारी केशव लोमटे, हामजा मुलाणी मामा, नेताजी नन्नवरे मामा, वीर पाटील इत्यादी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. स्नेहमेळाव्याचे प्रास्ताविक मारुती घोगरे यांनी केले. शाम नवले व राजाभाऊ हुकिरे यांनी सुत्रसंचालन केले तर क्षीरसागर यांनी आभार मानले. या संपूर्ण स्नेहमेळाव्याचे चित्रीकरण आणि छायाचित्रण संदीप पडवळ यांनी केले. स्नेह भोजनाचा आस्वाद घेऊन आणि खो खोच्या मैदानावर खो खो खेळून आठवणींना उजाळा देण्यात आला. २८ वर्षांनंतर आपल्या जिवलगांच्या गाठीभेटी होताना आनंदी झालेले चेहरे पाहून या परिश्रमाचा थकवा कुठल्या कुठे पळून गेल्याच्या भावना अनेकांनी व्यक्तकेल्या

# सावरगावची जिल्हा परिषद शाळा 'सर्वोत्कृष्ट'

**आरंभ मराठी/ धाराशिव**

तुळजापूर तालुक्यातील सावरगाव जिल्हा परिषद शाळेस सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्हा परिषद प्रशाला सावरगाव येथील विद्यार्थी दरवर्षी (८वी),शिष्यवृत्ती(५ वी व ८वी )परीक्षेत जिल्हा, तालुका निवड यादीत चमकत असतात. शालांत परीक्षा (१०वी) मध्ये शाळेचा निकाल चांगला असतो. शाळेत विविध सहशालेय उपक्रम राबविले जातात.शाळेच्या पटाचा आलेख दरवर्षी वाढत आहे.शाळा गुणवंत विद्यार्थी तयार करण्याचा आटोकाट प्रयत्न करत असते.याची दखल जिल्हा प्रशासनाने घेऊन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत व खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर,आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी,




जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, शिक्षण अधिकारी (प्रा.) अशोक पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक )श्रीमती सुधा साळूंके यांच्या हस्ते सावरगाव जिल्हा परिषद शाळेस ''सर्वोत्कृष्ट शाळा'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सर्वश्री कानिफनाथ माळी, गोकुळ शिंदे, संजय मुळे, सुनिल शिंदे व सर्व शिक्षक वृंद यांनी स्वीकारला. शाळेच्या या यशाबद्दल तुळजापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारीअर्जुन जाधव, केंद्रप्रमुख हणमंत कदम, सावरगावच्या सरपंच सौ सुवर्णाताई पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष बोबडे, राजकुमार पाटील, माजी सरपंच रामेश्वर तोडकरी,उपसरपंच धर्मराज शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष श्री राम राजे पाटील आदींनी कौतुक केले.

# सावित्रीबाई फुले विद्यालयाचा निकाल ९६ टक्के

**आरंभ मराठी / कळंब**

कळंब शहरातील सावित्रीबाई फुले विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९६ टक्के लागला आहे. परीक्षेत एकूण बसलेले विद्यार्थी २३६ होते. त्यापैकी २२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्राविण्य मिळवणारे विद्यार्थी ८७, प्रथम श्रेणी ६८, द्वितीय श्रेणी ५९, तृतीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये उपाडे प्रथमेश ९८.२० %, कातमांडे व्यंकटेश ९५.४०%, निंबाळकर समृद्धी ९५.२०%, थळकरी गार्गी ९४.६०%, भवर पियुष ९३%, गोडगे आदिती ९२.६०%, घुले वैष्णवी ९२.४०%, कुलकर्णी ऋतुजा ९१.६०%, शेख सिमरन ९०.८०%, कणसे चैतन्य ९०.८०%, तांबोळी सनोबर९०.६०%, वाघमारे अथर्व ९०.६०%, वाघमारे सृष्टी ९०.४०%, महाकुंडे आदित्य९०.४०%, शेवडे श्रुती ८९.८०%, माळी संकीता८९.६०%, गव्हाणे श्रावणी ८९.४०%, चोंदे प्रतीक्षा ८९.२०%, जाजू पृथ्वीराज ८९%, गव्हाणे यशराज ८८.८०%, रामेश्वरऋतुजा८८.८०%, मोहिते वैष्णवी ८८.८०%, देशमुख संयुक्ता ८८.८०% इटकर श्रावणी ८८.६०%, वाघमोडे आकांशा ८८.६०% चोंदे पियुष ८८.४०%, मुळे वेदिका ८८%, नाईकवाडे अस्मिता ८७.८०%, वाकडकर ऋतुजा ८७.४०%, गायकवाड श्रेया ८७.२०%, कुपकर श्रावणी ८६.६०%, जमाले प्रांजली ८६.४०%, परकाळे ओंकार ८६.२०%, कदम प्रतीक्षा ८५.६०% खंदारे जानवी ८५% हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती मनोरमा शेळके, डॉ.पांडुरंग भवर, अ‍ॅड. चत्रभुज भवर, भागवत सुरवसे, श्रीधर भवर, राम मुळीक, सूर्यकांत चव्हाण, चेतन भवर, सत्यन शेळके विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे, उपप्राचार्य डॉ.मीनाक्षी शिंदे, उपमुख्याध्यापक सोमनाथ सावंत, पर्यवेक्षक शंकर गोंदकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुरुम येथे सलग ३५ व्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज पारायण सोहळा भक्तिभावाने साजरा

## संत साहित्य,भक्ती आणि वारकरी परंपरेचा उत्सव; हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग





**आरंभ मराठी / मुरुम**

मुरुम शहरातील किसान चौक येथे अखंड श्रद्धा, भक्ती आणि संत परंपरेच्या अधिष्ठानाने परिपूर्ण असा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा यंदा सलग ३५ व्या वर्षी अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला. या आध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन पारायण सोहळा समितीच्या वतीने आणि ह.भ.प. मारुती महाराज कानेगावकर यांच्या कृपाशीर्वादाने ३ मेपासून ९ मेपर्यंत करण्यात आले होते. संपूर्ण सप्ताहात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे सुसूत्र आणि शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले होते. सकाळी काकड आरतीने प्रारंभ होऊन, ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री कीर्तन आणि मध्यरात्री हरिजागर अशा सातत्यपूर्ण भक्तिपर कार्यक्रमांनी वातावरण पावन झाले होते. सर्वच कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.या सप्ताहातील एक विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तनसेवा. या सेवेमुळे भक्तांसाठी ही एक अध्यात्मिक पर्वणी ठरली. समारोपाच्या दिवशी, ९ मे रोजी ह.भ.प. प्रशांत महाराज नांदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने हजारो भाविकांच्या उपस्थितीत सोहळ्याचा समारोप करण्यात आला. या दिवशी सकाळी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची ग्रामप्रदक्षिणा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक ढोल-ताशा, टाळ-मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. प्रत्येक घरोघर अनेक माता-भगिनींनी सुंदर व सुरेख रांगोळी लांबच लांब स्वागताकरिता काढले होते. याशिवाय रचनात्मक रांगोळ्या काढून देखील स्वागत करण्यात येत होते. टाळकरी, वारकरी, माता-भगिनी आणि लहान मुला-मुलींसह सर्व वयोगटातील भक्त या दिंडीत सहभागी झाले होते. पालखीची सुरुवात किसान चौक येथून झाली पुढे सुभाष चौक, गांधी चौक, हनुमान चौक, अशोक चौक, कुंभार विहीर मार्गे पुन्हा किसान चौक येथे आली. विविध चौकात पारंपरिक फुगड्या खेळून भाविकांनी आनंदोत्सव साजरा केला. ग्रामप्रदक्षिणेनंतर काल्याचे कीर्तन संपन्न झाले. यानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाची व्यवस्थाही करण्यात आली होती.या सोहळ्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे शहर व पंचक्रोशीतील हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग, भक्तिभावाने परिपूर्ण वातावरण आणि संयोजनातील शिस्तबद्धता. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ चालू असलेली ही भक्तिपर्वाची परंपरा आजही नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करत आहे. पारायण सोहळा समितीचे नियोजन, सेवा वृत्ती आणि संत साहित्याचा प्रसार हे या सप्ताहाच्या यशस्वितेचे खरे सूत्र आहे. या माध्यमातून मुरुम शहराने पुन्हा एकदा आपली सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा अभिमानाने जपली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# परंडा शहरात महाराणा प्रताप यांना जयंतीनिमित्त अभिवादन




**आरंभ मराठी / परंडा**

परंडा शहरातील महाराणा प्रतापसिंह चौकात महाराणा प्रतापसिंह प्रतिष्ठाणच्या वतीने वीर शिरोमणी मेवाड रत्न महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मा आ सुजितसिंह ठाकूर आणि मा नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दीवाल यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या भव्य मुर्तीचे पुजन तसेच पुष्पहार अर्पन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मा नगराध्यक्ष रमेशसिंह परदेशी, हिंदु वॉरियर्सचे संस्थापक धिरजसिंह ठाकूर, निवृत्त मेजर अरुणसिंह ठाकूर, रविंद्र मिश्रा, सचिनसिंह ठाकूर, मनोजसिंह ठाकूर, किरणसिंह ठाकूर, विक्रम मिश्रा, अँड. गोविंद कोटुळे,सत्यजितसिंह सद्दीवाल, लक्ष्मण गोरे, विशाल काशीद, समरजितसिंह ठाकूर, मदनसिंह सद्दीवाल, मदन दिक्षीत, अ‍ॅड. पृथ्वीराजसिंह सद्दीवाल, कुणाल जाधव, राहुलसिंह सद्दीवाल, संकेतसिंह ठाकूर, आशिषसिंह ठाकूर, सुधिरसिंह चौहाण, बल्ली ठाकूर, किरण पांडे, अमरसिंह ठाकूर, बंटी ठाकूर, ओंकार तबेलदार, आदर्शसिंह ठाकूर, यशसिंह परदेशी, हिंदु वॉरियर्सचे अध्यक्ष उमेश घाडगे, विकास साळुंके, मोहन दिक्षीत, चिया दिक्षीत पावन मिश्रा, संकेत शुक्ला, सुरजसिंह ठाकूर, अजय पांडे, तुषार पांडे, राज वळसंगकर, संग्या ठाकूर, रोहीत जाधव, यशसिंह ठाकूर, समाधान कोळेकर, विर मिश्रा, कार्तीक दिक्षीत, आनंद मोहिते, ओंकार काशीद आदी उपस्थित होते.

# ज्योतिषाचार्य पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्रविड यांनी घेतले श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन

**आरंभ मराठी / तुळजापूर**



वाराणसी येथील ज्योतिषाचार्य व पद्मश्री पुरस्कार प्राप्त विद्वान गणेश्वर शास्त्री द्रविड यांनी सोमवारी ( दि.१२) श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. त्यांनी मनोभावे पूजा-अर्चा व आरती करत देवीच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. त्यांच्या या भेटीप्रसंगी मंदिर संस्थानचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील व तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे यांनी त्यांचे स्वागत केले. गणेश्वर शास्त्री यांनी मंदिरातील आरतीत सहभागी होत भक्तिभावाने देवीची प्रार्थना केली. गणेश्वर शास्त्री द्रविड हे भारतातील ख्यातनाम ज्योतिषाचार्य असून अयोध्येतील राम मंदिराच्या भूमिपूजन व प्राणप्रतिष्ठेच्या मुहूर्ताचे त्यांनी यशस्वी निर्धारण केले आहे. त्यामुळे तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची सद्य भेट अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. नुकतेच भारत सरकारतर्फे त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले असून, या निमित्ताने मंदिर संस्थानच्या वतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. या वेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, आनंद कंदले, सचिन जाधव, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पराडे, दीपक शेळके, स्वच्छता निरीक्षक उमेश गुंजाळ, सुरज घुले, दयानंद जोगदंड तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आर्फिया पटेल हिने पटकावली चार सुवर्णपदके



**आरंभ मराठी / धाराशिव**

धाराशिव येथे तुळजाभवानी क्रीडा संकुलात पार पडलेल्या भारतीय म्युझिकल चेअर रोलर स्केटिंग स्पर्धेत श्रीपतराव भोसले हायस्कूलची इयत्ता सातवीत शिकणारी आर्फिया पटेल हिने राज्यस्तरीय स्पर्धेत चार सुवर्णपदक पटकावले. या तिच्या यशाबद्दल आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील , सरचिटणीस प्रेमा सुधीर पाटील , मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील , प्राचार्य नंदकुमार नन्नवरे , उपमुख्याधापक प्रमोद कदम , सातवीचे पर्यवेक्षक राजेंद्र जाधव, विवेक कापसे, एस .ए . राठोड , एस .के . वाघमारे , श्री.जारवाल , अमित लोमटे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# माजी आमदाराच्या पुत्राकडून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला दोन ई-रिक्षा भेट

**आरंभ मराठी / तुळजापूर**



कर्नाटक राज्यातील बेंगळुरू येथील माजी आमदार निर्मलकुमार सुराणा यांचे पुत्र आदित्य सुराणा आणि त्यांच्या पत्नी प्रतिक्षा सुराणा यांनी आज श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला दोन ई-रिक्षा भेट दिल्या. तसेच मंदिर संस्थानला अकरा हजार रुपयांची देणगी देखील अर्पण केली. आदित्य सुराणा हे बेंगळुरूमधील नामवंत उद्योगपती असून, प्रज्ञा ऑटोमोबाइल्स या कंपनीचे ते व्यवस्थापकीय संचालक आहेत. सुराणा दांपत्याने आपल्या कुटुंबीयांसह तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले आणि भक्तांच्या सेवेसाठी दोन ई-रिक्षा मंदिर संस्थानला अर्पण केल्या. ई-रिक्षांचे लोकार्पण आदित्य सुराणा व त्यांच्या पत्नी प्रतिक्षा सुराणा यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार, मंदिर संस्थानचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या ई-रिक्षा मंदिरात येणाऱ्या वयोवृद्ध आणि दिव्यांग भक्तांसाठी उपयुक्त ठरणार असून, त्यांना मंदिर परिसरात येण्या-जाण्यास सहज सुलभ होणार आहे. या सन्मानार्थ मंदिर संस्थानच्यावतीने सुराणा दांपत्यांना श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि महावस्त्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे, लेखाधिकारी रामदास जगताप, नितीन काळे, आनंद कंदले, प्रवीण अमृतराव, सचिन जाधव, गणेश मोटे, महेंद्र आदमाने, सुहास साळुंके, परिक्षीत साळुंके, ऋषभ रेहपांडे, आसिफ डांगे, शशिकांत शिंदे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला व बाल विकास आयुक्तालयाचे सहा.आयुक्त जवादे यांची शिशुगृहाला भेट

**आरंभ मराठी / धाराशिव**



धाराशिव: पुणे महिला व बाल विकास आयुक्तालयाचे सहाय्यक आयुक्त तथा कार्यक्रम व्यवस्थापक योगेश जवादे यांनी येथील सह्याद्री अंकुर शिशुगृहाला भेट दिली. १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या या विशेष दत्तक संस्थेतील (० ते ०६ वयोगटातील अनाथ मुलांचा निवासी प्रकल्प) मुलांची त्यांनी अत्यंत आत्मीयतेने विचारपूस केली आणि संस्थेच्या कार्याची बारकाईने पाहणी केली.या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी माननीय श्री. किशोर गोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी माननीय श्री. अमोल कोवे, पर्यवेक्षक माननीय श्री.व्यंकट देवकर, श्रीमती विभावरी खुणे (जिल्हा महिला बाल विकास विभाग) आणि चाईल्ड-लाईनचे सर्व सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते.जवादे यांनी संस्थेचे मार्गदर्शक डॉ. दिग्गज दापके-देशमुख अन्य संचालक, पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधुन योग्य सुचना दिल्या. संस्थेच्या व्यवस्थापनाने लहान मुलांसाठी पुरवलेल्या दर्जेदार सोयीसुविधांचे त्यांनी मुक्त कंठाने कौतुक केले.योगेश जवादे यांनी ही भेट निश्चितच सह्याद्री अंकुर शिशुगृहातील कर्मचाऱ्यांसाठी आणि तेथील चिमुकल्या बाळांसाठी एक मोठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारा अनुभव ठरली.

# उमरगा तहसील कार्यालयातील कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**आरंभ मराठी / उमरगा**




उमरगा तहसील कार्यालयातील कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, उमरगा तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, निराधार, वेगवेगळ्या प्रकारचे अनेक कामे तहसील कार्यालयाशी संलग्न असल्याने अनेक वेळा हेलपाटे मारावे लागतात. परंतु, उमरगा तहसील कार्यालयातील कामचुकार कर्मचारी लेटलतिफ आणि शासनाने घातलेल्या नियमांचे पालन करत नाहीत. उलट कार्यालयात येऊन काही कर्मचारी फक्त सही करून जातात. यामध्ये आस्थापना विभाग, लेखा विभाग - युवराज शिंदे, नायब तहसीलदार महसूल - भिमाशंकर बेरूळे, नायब तहसीलदार भारती, नैसर्गिक आपत्ती - कदम, संजय गांधी योजना - ठाकूर, निवडणूक विभाग, भुकंप पुनर्वसन - मुळे, शिपाई गायकवाड, पोतदार, अनुपस्थित होते. हे वरील कर्मचारी शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाची खिल्ली उडवत आहेत. ही बाब अखिल भारतीय छावा संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब माने यांनी तहसीलदार गोविंद येरमे यांच्या निदर्शनास आणून दिली. स्थानिक कर्मचारी याचा दूरूपयोग करत आहेत. अशा कर्मचाऱ्यांना जवळचे २ जिल्हे सोडून बदली करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी अखिल भारतीय छावा संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब माने, सामाजिक कार्यकर्ते युवराज गायकवाड आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

# ईट येथे बौद्ध जयंती निमित्त पंचशील ध्वजाचे ध्वजरोहन



**आरंभ मराठी / भूम**

ईट येथील भीम नगरमध्ये बुद्ध पौर्णिमेनिमित्त बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन मुख्याध्यापक सुरेखा अहिरे व लालन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले. बुद्ध जयंती निमित्त सिद्धार्थ अहिरे यांनी त्रिसरण पंचशील घेऊन पूजा पाठ करण्यात आला. त्याचबरोबर पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण सर्जेराव अहिरे व शिवाजी अहिरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांचा भाषणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपस्थित सर्वांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. भीम नगर मधील तरुणांनी सहभाग नोंदवून उत्तमरीत्या कार्यक्रम पार पाडला.

# सोयाबीन पिकविम्यासाठी तालुकास्तरीय समिती गठीत

## शेतकऱ्यांना तक्रारी अर्ज दाखल करण्याचे आवाहन

**आरंभ मराठी / मुरुड**



जिल्हाधिकारी लातूर यांच्या सुचनेनुसार खरीप पिक विमा २०२४ अंतर्गत लोक प्रतिनिधी व शेतकरी यांच्याकडून प्राप्त तक्रारीबाबत तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, लातूर तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना पीक नुकसानीची पूर्व सूचना देऊन देखील पिकविमा मिळाला नाही अशा शेतकऱ्यांना दिनांक १५ मे पर्यंत तालुका कृषी कार्यालयात तक्रारी अर्ज करता येणार आहे. खरीप पिक विमा २०२४ विषयाच्या अनुषंगाने तालुक्यातील खरीप सन २०२४ अंतर्गत पिक विमा काढलेल्या तालुक्यातील लाभार्थींना पूर्वसूचना पिक विमा कंपनीकडून विविध कारणास्तव नाकारण्यात आला आहे. यासाठी आता शेतकऱ्यांना तक्रारी अर्ज करण्यात येणार असून ही समिती शेतकऱ्यांचे अर्ज स्विकारून वरीष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करणार आहे. दरम्यान लातूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पिक विमा मिळाला नसल्यामुळे शेतकऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरून जिल्हा स्तरावर लोकप्रतिनिधी शेतकरी व विविध संघटना यांचेकडून तक्रारी प्राप्त होत असल्याने प्राप्त होणाऱ्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने अपात्र केलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारीबाबत दिनांक १५ मे पर्यंत विशेष शिबीर आयोजित करुन शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी स्विकाराव्यात व प्राप्त तक्रारींची पडताळणी करुन त्याबाबत तालुकास्तरीय समितीने योग्य तो निर्णय घेऊन सर्व संबंधितांस अवगत करणे बाबत तसेच व्यापक स्वरुपात प्रसिद्धी देणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तालुका स्तरीय समितीची बैठक घेऊन शेतकऱ्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची पडताळणी करून त्याबाबत तालुकास्तरीय समिती निर्णय घेणार आहे. यानंतर अहवाल जिल्हास्तरीय समितीकडे सादर करणार आहे. तरी तालुक्यातील विमा नुकसान भरपाई पासून वंचित शेतकऱ्यांनी आपला तक्रारी अर्ज १५ मे पर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे, असे आवाहन तहसीलदार लातूर सौदागर तांदळे व तालुका कृषि अधिकारी लातूर दिलीप राऊत यांनी केले आहे.

# बलसुर येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सुरेश बिराजदार यांच्या हस्ते सत्कार

**आरंभ मराठी / उमरगा**



इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेतील बलसुर येथील श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार बलसूर येथे नुकताच करण्यात आला. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव प्रा. सुरेश बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक पुण्यनगरीचे वृत्त संपादक धनंजय रणदिवे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमरगा तालुकाध्यक्ष बाबा जाफरी, लोहारा तालुकाध्यक्ष सुनिल साळुंखे, संस्थेचे माजी अध्यक्ष माणिकराव बिराजदार, संचालक साहेबराव पाटील, कोषाध्यक्ष दत्तात्रय बिराजदार, भारत शिक्षण संस्थेचे संचालक रमेश बिराजदार, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य कवलजीत बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला त्यात प्रामुख्याने विज्ञान शाखेतील प्रथम आलेली विद्यार्थिनी संस्कृती पाटील हिने ८२.१७%, द्वितीय आलेली विद्यार्थिनी स्वाती जवळगे हिने ८२% तर तृतीय आलेल्या सुहासिनी पवार या विद्यार्थिनीने ८०.१७% गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. याशिवाय कला शाखेतील प्रथम येणारी सानिया शेख हिने ७८.६७% गुण मिळवले. द्वितीय वैष्णवी कुन्हाळे ७४.६७% तर तृतीय मंदोदरी दुधभाते हिला ७१.८३% गुण मिळाले असून यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, त्यांना पुढील वाटचालीस सदिच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन प्रा. पी. बी. सुर्यवंशी यांनी केले, तर प्रा. बी. टी. जाधव यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सोमनाथ आवताडे, पर्यवेक्षक सतीश वाकडे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक शिवाजी उपासे आणि अन्य शिक्षक, कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहावीच्या परिक्षेत गायत्री इंगळे मुरुम शहरात प्रथम,कौतुकाचा वर्षाव

## जि.प.कन्या प्रशाला व डॉ.झाकीर हुसेन उर्दू शाळेचा शंभर टक्के निकाल

आरंभ मराठी / मुरुम

इयत्ता दहावीच्या निकालाची घोषणा होताच विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल व उत्सुकता निर्माण झाली. ''आपण पास झालो का?'', ''किती टक्के मिळाले?'', ''कोण शहरात प्रथम?'' या आणि अशा अनेक प्रश्नांनी विद्यार्थ्यांच्या मनात घालमेल निर्माण झाली होती. मात्र, निकाल जाहीर होताच मुरुम शहरातील शाळांनी आपली यशस्वी वाटचाल पुन्हा एकदा सिद्ध केली असून अनेक शाळांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. मंगळवारी निकाल जाहीर होताच शहरातील सर्व शाळांमध्ये जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले.



मुरुम शहरातून इयत्ता दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावणारी विद्यार्थिनी गायत्री इंगळे हिने ९७.२०% गुण प्राप्त करून शहरात अव्वल स्थान मिळवले आहे. तिच्या यशानंतर दुसऱ्या क्रमांकावर प्रणिता राठोड हिने ९६.८०% गुण मिळवून आपले स्थान निश्चित केले. तर पायल पनशेट्टी व रेणुका वाकळे या दोघींनी ९४.४०% गुण मिळवत संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक मिळवला आहे. पल्लवी शिंदे हिने ९४% गुण मिळवत चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे. या सर्व विद्यार्थिनी प्रतिभा निकेतन विद्यालयाच्या असून विद्यालयाच्या यशाचा आलेख सातत्याने उंचावत आहे.गेल्या अनेक वर्षांपासून उत्तम निकालाची परंपरा राखणाऱ्या जिल्हा परिषद कन्या प्रशालेने यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील सोनाली भोकले हिने ९३.६०% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. दुसऱ्या क्रमांकावर आंचल पवार ९३%, तिसऱ्या क्रमांकावर पूनम राठोड ९२% तर संजना राठोड हिने ९१% गुण मिळवत चतुर्थ स्थान प्राप्त केले आहे. डॉ. झाकीर हुसेन उर्दू माध्यमिक विद्यालयाचा अत्यंत दुरावस्थेतील स्थितीतही या शाळेने यंदाही शंभर टक्के निकाल देत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. रिदाफातिमा लोणी हिने ९०.८०% गुणांसह शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला आहे. हिना जमादार ८७%, मसीहा नुरसे ८५% व मेहक इनामदार ८३.३०% यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे. जिल्हा परिषद मुलांची प्रशाला या शाळेने ९५.१२% निकाल देत यशाची वाटचाल कायम ठेवली आहे. अंकिता औरादे ९२% प्रथम, ओम घोडके ९०.२०% द्वितीय, तर आर्यन कांबळे ९०% तृतीय क्रमांकावर राहिले आहेत. ज्ञानदान विद्यालयाचा निकाल ९३.७५% लागला आहे. आदिती इंगळे ८२% प्रथम, साक्षी देडे ८१% द्वितीय, तर शैलेश राठोड ७८% तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.या यशस्वी निकालानंतर सर्व शाळांचे मुख्याध्यापक, उपप्राचार्य आणि शिक्षकवर्गांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे. प्रतिभा निकेतनचे उपप्राचार्य उल्हास घुरघरे, डॉ. झाकीर हुसेन विद्यालयाच्या सय्यदा खुतेजा बेगम खतीब, कन्या प्रशालेचे हरी शेके, मुलांची प्रशालेचे विजयकुमार देशमाने आणि ज्ञानदान विद्यालयाचे गुराप्पा कुंभार यांच्यासह सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर संपूर्ण मुरुम शहराचे नाव उज्वल केले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.







# छत्रपती संभाजीराजे जयंतीनिमित्त सिरसाव येथे शिबिर; ५१ नागरिकांनी केले रक्तदान




आरंभ मराठी / परंडा

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परंडा तालुक्यातील सिरसाव येथे मंगळवारी (दि.१३) भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवबा बहुउद्देशीय सामाजिक संस्था व समस्त ग्रामस्थ सिरसाव यांच्या वतीने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या उक्तीनुसार गावातील ५१ नागरिकांनी यावेळी रक्तदानाचा हक्क बजावला. छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीनिमित्त विशेष चर्चा सत्राचे आयोजनही यावेळी करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरा वेळी शोभा बहुउद्देशीय संस्थेचे सर्वेसर्वा बोबडे, सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील, उमेश जाधव, विशाल झोरी यांच्यासह गावातील तरुणांनी सहभाग घेतला.

# खानापूर येथील व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव तालुक्यातील खानापूर येथे सोमवारी (दि.१२) रात्री झालेल्या श्रद्धा शिंदे यांच्या व्याख्यानास शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या सुरवातीला श्रद्धा शिंदे यांनी शिवशंभूंच्या मूर्तीचे पूजन केले. व्याख्यानामध्ये त्यांनी लव्ह जिहाद, गो हत्या, विशाळगडावरील अतिक्रमण, धर्मांतरण, शिवरायांचा इतिहास व आजची पिढी, भारत पाकिस्तान युद्ध, शंभूराजेची हत्या या विषयावर भाष्य केले. पहलगाम येथील मृत्यु झालेल्या निष्पाप भारतीय नागरिकांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी खानापूरसह कौडगाव व धाराशिव येथील हिंदू बांधव व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




# ३० वर्षानंतर जमला चित्रकलेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

आरंभ मराठी / धाराशिव

लातूर शहारातील एमआयडीसी सभागृहात बंकटस्वामी बीड संस्था द्वारा संचलित सर्वात जुने चित्रकला महाविद्यालयात सन ९५ ,९६,९७ या वर्षात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा तब्बल ३५ वर्षांनी स्नेह मेळावा संपन्न झाला. मेळाव्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने करण्यात आली व पहेलगाम भ्याड हल्लातील शहीद भारतीय नागरिक व जवान , चित्रकला महाविद्यालयचे स्व.कुलकर्णी , निकम वर्गमित्र स्व. सावरीकर कलावंत ज्ञात अज्ञातांना श्रद्धांजली अर्पण केली . त्यानंतर प्रास्ताविक नेताजी यादव यांनी केले त्यानंतर प्रदीपकुमार शिंगवी सोलापूर ' स्नेहालय ' यांच्या सौजन्याने शबनम पिशवी , फरटोपी ,पंचा, स्मृतीचिन्ह देऊन जेष्ठ शिक्षक शिवाजी वाघ प्राचार्य अविनाश सातपुते,प्रा. संजय खोचरे,प्रा.विनय बागडे संस्था प्रतिनिधी सौ. वैशाली भोसले - सातपुते यांचा माजी विद्यार्थांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थित वर्गमित्रांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर मान्यवर व माजी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. सदर माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी विशेष परिश्रम दत्ता शिंदे, सुदर्शन पाटील यांनी घेतल्याने सौ. मिरा वाघ- चव्हाण कुटुंबाच्या वतीने शाल पुष्पहाराने सत्कार करण्यात आला. सुत्रसंचलन शेषनाथ वाघ यांनी केले तर आभार सौ. सविता आळणे यांनी मानले. त्यानंतर बहारहार आवाजात अनिस शेख, कामशेट्टी, किरण वाघमारे , शेषनाथ वाघ, नेताजी यादव यांच्या गायनावर सर्व वर्गमित्रांनी नृत्यविष्कार सादर केला. ३० वर्षानंतर थेट भेटीने वर्गमित्रांमध्ये आनंद दिसून येत होता. भोजन, चहापानानंतर पसायदानाने मेळाव्याची सांगता करण्यात आली.



# भूममध्ये ब्राह्मण महासंघाच्या वतीने उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

आरंभ मराठी / भूम

ब्राह्मण महासंघ भूम तालुक्याच्या वतीने शुक्रवारी ₹ दि.९) श्रीराम मंदिर भूम येथे विशेष प्राविण्यासह उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा तसेच त्यांना अभ्यासामध्ये प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या पालकांचा सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास शाळू, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक एकनाथ बेलसरे मंचावर उपस्थित होते. यासोबतच तालुकाध्यक्ष सुधीर देशमुख, ज्येष्ठ व्यक्ती विलासराव देशमुख, अनिल बुरटे या मान्यवरांच्या हस्ते भगवान श्री परशुरामांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दिप प्रज्वलित करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये यश मिळवलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी- श्रावणी औदुंबर कुलकर्णी, समीक्षा शेखर कुलकर्णी, संस्कृती प्रसाद कुलकर्णी, प्रांजल विलासराव कुलकर्णी, कार्तिक किशोर वंजारवाडकर, ओंकार अभय खुळे, संस्कार संतोष कुलकर्णी यांचा सन्मान सन्मानपत्र व सन्मानचिन्ह शाल व गुच्छ देऊन करण्यात आला. यावेळी बहुसंख्येने समाज बांधव व भगिनी उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शनही केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुधीर कुलकर्णी यांनी केले.




# धनंजय शिंगाडे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धनंजय गंगाधर शिंगाडे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने कराड येथे आयोजित ३१ व्या नवोदित मराठी साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला. गेल्या तीस वर्षांपासून धनंजय शिंगाडे यांनी धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव योगदान दिले आहे. त्यांनी विविध औद्योगिक संस्थांची स्थापना करून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. यासोबतच, बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी समाजातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी ३० पेक्षा अधिक संस्था उभारल्या आहेत, ज्या यशस्वीपणे कार्यरत आहेत. या पुरस्कार सोहळ्याला सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लोकशाही न्यूज चॅनेलचे विशाल पाटील, शरद गोरे राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे, आणि ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत प्रवीण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते शिंगाडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी झी २४ तासचे जिल्हा प्रतिनिधी विश्वस्त अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद ज्ञानेश्वर पतंगे, पत्रकार सुधीर पवार, संतोष वतने, अनिरुद्ध कावळे, शंकर अंगरखे, प्रवीण पौळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. धनंजय शिंगाडे यांच्या सामाजिक कार्याबरोबरच त्यांनी राजकीय क्षेत्रातही सक्रिय योगदान दिले आहे. त्यांच्या या व्यापक कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने त्यांना या पुरस्काराने गौरवले आहे.



# फुले, शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी



आरंभ मराठी / धाराशिव

फुले, शाहु, आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती अर्थात बुध्द पौर्णिमा मोठ्या उत्साहाने विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरी करण्यात आली. जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचे विचार जगाला प्रेरणादायी ठरतात, सध्या युध्द गत परिस्थिती निर्माण झाली असतांना जगाला युध्दाची नव्हे तर बुध्दाची गरज आहे. प्रथम विश्वरत्न बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करण्यात आले. सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. महामानवाच्या जयंती महोत्सवातील आकर्षक देखावा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या देखाव्याचा समारोप बुध्द पौर्णिमेनिमित्त केला जात असुन तथागतास अभिवादन करण्यासाठी यावेळी मोठी गर्दी झाली होती. यावेळी डॉ. स्मितातार्इ गवळी, रक्तदाते इंजि.सुभाष नगडे, पोलीस आकाश ओव्हाळ पुणे, प्रा.गुरुनाथ गायकवाड मुंबई, सामाजिक कार्यकर्ते कानिफनाथ देवकुळे, संत गाडगेबाबा जयंती मंडळाचे जिल्हाध्यक्ष नेताजी धोंगडे यांच्यासह इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्ष राजश्री कदम,सविता लगाडे,जयश्री चव्हाण, विजयमाला धावारे,बौध्दाचार्य गुणवंत सोनवणे,समितीचे गणेश वाघमारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बलभीम कांबळे यांनी केले तर आभार गणेश वाघमारे यांनी मानले.

# भूम येथील रमाई नगर येथे बुद्ध जयंती उत्साहात साजरी

आरंभ मराठी / भूम



भूम येथील रमाई नगर येथे गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण नंदकुमार शिंदे व तलाठी मोहोळ यांचे हस्ते करण्यात आले. भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्प आणि दिप प्रज्वलन करून सर्व उपस्थित महिलांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका सारिका थोरात, माजी मुख्याध्यापिका पुष्पा म्हस्के, सरोजा शिंदे, सरिता शिंदे, अर्चना सोनवणे, अश्विनी कौशल्या बनसोडे, शांताताई सोनवणे, चंदनशिवे मॅडम, लोखंडे मामी आदी महिलांनी पूजन केले. याचबरोबर विनायक मस्के, प्राध्यापक राम लिंग शिंदे, शिवसेना शिंदे गट मागासवर्गीय विभाग भूम तालुका अध्यक्ष सुनील थोरात, प्रतापलिंग मुळे, चंदनशिवे, प्रमोद सोनवणे, बापू सोनवणे, राहुल धावारे, अमोल सोनवणे महेंद्र थोरात पप्पू, बगाडे धम्मपाल दाभाडे, अमर गायकवाड, सिद्धधन शिंदे, बबलू बनसोडे, मेजर लांडगे, गोलमाल सुकाळे, मिलिंद सोनवणे तसेच रमाई नगर भूम येथील शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# समाधानकारक पावसाचे संकेत, बळीराजाची खरीप हंगामपूर्व मशागत

## ट्रॅक्टरद्वारे मशागतीची कामे करण्याकडे शेतकऱ्यांचा ओढा

आरंभ मराठी / तेर

अवघ्या पंधरा दिवसावर येऊन ठेपलेल्या पावसाळ्यामुळे खरीप पुर्व पेरणी मशागतीची कामे उरकण्यासाठी बळीराजाची धांदल उडाली असून, पेरणीसाठी जमीन तयार करण्यासाठी बळीराजा कामाला लागला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचे चटके सहन केलेल्या शेतकऱ्यांने खरिपाच्या पेरणीची तयारी आता सुरू केली आहे. आता मे महिना संपत आला असून पावसाळा अवघ्या पंधरवाड्यावर आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीपुर्व मशागत करून जमीन पेरणी करण्यासाठी तयार करण्यासाठी शेतकरी लगभग चालू करीत आहे तेर व परिसरात खरीप हंगामातील सोयाबीनचे प्रमुख पीक घेतले जाते. नगदी पीक असल्याने शेतकरी या पिकाकडे वळला आहे. सोयाबीन सोबतच तूर, मुग व उडीद ही दुय्यम पिके घेतली जातात. २०२४-२५ च्या हंगामात पाऊस बऱ्यापैकी पडला होता. त्यामुळे उसाची लागवडही बऱ्यापैकी झाली आहे. मागील वर्षी हमी भावाचा फटका सोयाबीन पिकाला शासणाने हमी भाव ४८९२ रू.जाहीर केला होता. परंतु, व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याची मोठी लूट केली. ४२०० रू.पुढे भाव खुल्या बाजारात सरकलाच नाही. मजुरीचे दरही कमालीपेक्षा जास्त वाढले. शेतकऱ्याच्या पदरी खर्च वजा जाता ३० टक्केही उत्पन राहिले नाही. बैलजोडीपेक्षा ट्रॅक्टरच्या सहाय्याने मशागत करण्यासाठी पसंती दिली आहे. पशूधन कमी झाल्यामुळे छोट्या ट्रॅक्टरवर मशागत करण्याचा मार्ग निवडला आहे. त्यामुळे झटपट मशागत उरकत आहे. जमीन पेरणीसाठी काळीभोर करून ठेवली आहे. यावर्षी पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून चांगला असल्याचे सांगितले जात आहे. सोयाबीन पीक तोट्यात जात असले तरी जिरायत शेतकऱ्यांना सोयाबीन शिवाय पर्याय नाही. दरम्यान पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी मशागतीसाठी वेग घेतला आहे.



### अवकाळी पावसामुळे मशागतीला मदत

मागील चार दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र अवकाळी पाऊस पडत आहे. या पावसामुळे पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना मदत होत आहे. काही भागात मोठा पाऊस झाला असून नांगरणी केलेल्या रानातील ढेकळे फुटण्यास मदत झाली आहे. आजदेखील काही भागात पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ढगाळ वातावरणामुळे उन्हाचा चटका कमी झाला असून, बळीराजाला शेतातील कामे करण्यासाठी वातावरणाचीही साथ मिळत आहे. यावर्षी नियोजित वेळेत पावसाचे आगमन होणार असल्याचा अंदाज असल्याने या पंधरा दिवसात शेतकरी सर्व कामे करून घेतली असा अंदाज आहे.

# देशभक्तीपर गीतांचे सादरणीकरण

आरंभ मराठी / धाराशिव



शहरतील समता नगर येथे कलाविष्कार प्रस्तुत मेलडी स्टार्स हौशी छंदी गायकाच्या समूहाच्या वतीने 'ऑपरेशन सिंदूर' भारतीय सैन्य दलाच्या यशस्वितेस सलामी म्हणून देशभक्तीपर गीतांचे सादरणीकरण करण्यात आले. प्रथम समुहासाठी नवीन साऊंड सिस्टीमचे मुख्य प्रवर्तक युवराज नळे, समन्वयक शरद वडगावकर,सह सन्मवयक मल्हारी माने, रविंद्र कुलकर्णी ,सौ.वर्षा नळे यांच्याहस्ते पुजन करण्यात आले. त्यानंतर पहेलगाम भ्याड हल्लात शहीद भारतीय नागरिक व जवांनांना श्रद्धांजली अर्पित करुन देशभक्तीपर गीत गायन रविंद्र कुलकर्णी, शेषनाथ वाघ,शरद वडगावकर, मल्हारी माने, महेश उंबर्गीकर, ध्रुपद ढेकळे, मुकुंद राजेनिंबाळकर, सुजीत अंबुरे, नितीन बनसोडे, अनिल मालखरे , धनंजय कुलकर्णी, राजाभाऊ कारंडे, सुशील कुलकर्णी, विद्युलता दलभंजन, तारा मोरे, बबिता ढेकळे, प्रगती कुलकर्णी यांनी देशभक्तीपर गीत गायन केले. राष्ट्रगीतांने कार्यक्रमाची सांगाता करण्यात आली.